लोकमत

# 'रस माधव वटी'चे वाटप

## महानगरपालिकेतील २० हजार कोरोना वॉरियर्स

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : आनंदनाथ महाराज सांगवडेकर व राजवैद्य समीर जमदग्नि यांच्या मार्गदर्शनाने चालविण्यात येत असलेल्या 'चला... भारत सशक्त करू या' मोहिमेंतर्गत विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय व रिसर्च सेंटर, कोल्हापूर आणि क्विकहील फाउंडेशनच्या वतीने पालिकेतील २० हजार कोरोना वॉरियर्सना (सफाई कर्मचारी, वॉर्ड ऑफिसर, पालिकेतील इतर कर्मचारी) रस माधव वटीचे वितरण करण्यात आले.

या वेळी महापौर मुरलीधर मोहोळ, संयोजक वैद्य तुषार सौंदाणकर, वैद्य राहुल शेलार, क्विकहील सीएसआर हेड अजय शिर्के, वैद्य श्रीकांत काकडे, वैद्य गिरीश शिर्के, वैद्य अभय जमदग्नी, वैद्य विनय सचदेव आदी उपस्थित होते.

Hello Pune
Page No. 5 Sep 09, 2020
Powered by: erelego.com